


सोलापूर महानगरपालिका
कामगारकल्याण जनसंपर्क
विभाग



# स्वच्छता पंधरवडा या अनुषंगाने आयुक्त श्रीमती शीतल तेली-उगले मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली “सेवा दिवस” चे आयोजन

Volume IX | Issue 16 | Date 18-09-2023

स्वच्छ भारत अभियांन (नागरी) २.०, स्वच्छता ही सेवा व इंडियन स्वच्छता लीग २.० च्या अनुषंगाने गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालयाच्या व स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालयाच्या निर्देशानुसार सोलापूर शहरात दि. १५ सप्टेंबर, २०२३ ते ०२ ऑक्टोबर, २०२३ हा स्वच्छता पंधरवडा म्हणून सोलापूर महानगरपालिकेमार्फत साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने विविध उपक्रम सोलापूर महानगरपालिकेकडून राबविण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने मा. प्रशासक तथा आयुक्त श्रीमती शीतल तेली-उगले मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७/०९/२०२३ सकाळी ८.०० वाजता रोजी “सेवा दिवस” चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अंतर्गत किल्ला बगिचा, सिद्धेश्वर मंदिर परिसर व महात्मा गांधी प्राणी संग्रहालय या तीन ठिकाणी स्वच्छता शपथ, स्वच्छता मोहीम व स्वच्छतेच्या महत्वाबाबत पथनाट्य या तीन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सोलापूर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थपन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, सर्व मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक तसेच एकूण 47 शाळा व महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका, प्राध्यापक-प्राचार्य वर्ग, विविध सामाजिक संस्था, सर्व समुदाय संघटक व बचत गट महिला, स्वेच्छेने आलेले नागरिक, इ यांच्या संयुक्त विद्यमाने सदर सर्व कार्यक्रम घेण्यात आले. तसेच याप्रसंगी उत्तम काम करणारे सफाई कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान व सत्कार करण्यात आला. या उपक्रमामध्ये शालेय विद्यार्थी तसेच शिक्षक यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला व त्यांना सहभागी झाल्याबद्दल पुष्पगुच्छ व सहभागाबाबत प्रशस्तीपत्र देऊन आभार व्यक्त करण्यात आले. त्याच बरोबर या उपक्रमाच्या माध्यमातून सोलापूर शहरातील नागरिकांना ओला कचरा व सुका कचरा वर्गीकरण, प्लास्टिक बंदी संदर्भातील माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.